| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिद्धिपत्रक**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**<br>**पुणे-४११००६** | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

**जा.क्र./पोउआ/वाह/ ६३९८ /२०२४ पुणे** **दिनांक -०३/०९/२०२४**

पुणे शहरातील वानवडी वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, वानवडी वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी काही वाहतुक संदर्भातीस आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

पुणे ते सोलापुर रोड हा मुख्य रस्ता असुन त्यावरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळीत होण्यासाठी फातीमानगर चौक व रामटेकडी चौकात वाहतुकीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

**वानवडी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत**

- ➢ **रामटेकडी रोडने रामटेकडी चौकामधुन सर्व प्रकारच्या वाहनांना उजवीकडे हडपसरकडे जाण्यास प्रवेश बंद/ मनाई करण्यात येत आहे.**
- **रामटेकडी चौकामधुन डावीकडे वळण घेवुन काळुबाई जक्शंन वरुन यु- टर्न घेवुन हडपसरकडे जावे.**
- ➢ **शिवरकर रोडवरुन येवुन फातीमानगर चौकामध्ये सर्व प्रकारच्या वाहनांना हडपसरकडे (उजवीकडे) वळण घेण्यास मनाई करण्यात येत आहे.**
- **फातीमानगर चौकामधुन डावीकडे वळण घेवुन भैरोबानाला चौकामधुन यु- टर्न घेवुन हडपसर कडे जावे.**
- ➢ **भैरोबानाला चौकामधुन येवुन फातीमानगर चौकामध्ये सर्व प्रकारच्या वाहनांना उजवीकडे शिवरकर रोडवरती जाण्यास प्रवेश बंद / मनाई करण्यात येत आहे.**
- **भैरोबानाला चौकामधुन प्रिन्स ऑफ वेल्स रोडने सरळ जावुन हायलँड ॲव्ह्येन्यु रोडवरुन शिवरकर रोडला जावे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – / /२०२४ ते दिनांक – / /२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,
वाहतूक शाखा पुणे शहर

प्रति,

**१)जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ४,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४)सर्व प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, पुणे शहर.**
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित यांना तात्काळ अदा करून, यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.